नियमित दिवाणी दावा नं. २०४/२०२१

निशाणी क्र. १८ वरील आदेश

सी.एन.आर.क्र. **MHKO110021152021**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादी यांचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत, अडथळा करु नये म्हणून दावा मिळकतीमध्ये निशाणी क्र. ५ चे तुर्तातुर्त मनाई अर्जाचे निकालापावेतो जैसेथे परिस्थिती ठेवणेबाबत आदेश पारित व्हावेत यासाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जाद्वारे वादी यांचे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द दावा मिळकतीची वाटणी होऊन तुटक कब्जा मिळणेसाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी हे त्यांचे विधीज्ञांमार्फत हजर झालेले आहेत. प्रतिवादी यांना समन्स व नोटीस लागू होऊन सुध्दा त्यांनी त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल केलेली नाही. सदर प्रतिवादी हे दावा मिळकतीबाबत दस्त करणेच्या तयारीत असून दावा मिळकत जबरदस्तीने कब्जा करणेच्या प्रयत्नात आहेत असे वादी यांना खात्रीलायक समजून आलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी वादी यांचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत, अडथळा करू नये याबाबत जैसेथे परिस्थिती ठेवणेबाबत वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. १ यांनी प्रस्तुत अर्जाचे पाठीमागे आपले म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्जास विरोध दर्शविला. प्रतिवादी क्र. १ यांचे म्हणण्यानूसार ते दावा मिळकतीसंदर्भात कोणताही व्यवहार करणार नाहीत. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

४. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी निशाणी क्र. २१ कडे आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास तिव्र विरोध दर्शविला. प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे म्हणण्यानुसार दावा मिळकतीमधील त्यांचे असले कब्जातील ५ गुंठे व २ गुंठे मिळकतीमधून बेदखल करण्याचे प्रयत्नात आहेत. वादी यांची दावा मिळकतीबाबत तात्काळ आदेशाची आवश्यकता नाही. प्रस्तुत

कामी जैसेथे परिस्थिती ठेवणेबाबत कोणतेही कारण घडलेले नाह. सबब, वादी यांचा प्रस्तुतचा जैसेथे परिस्थितीचा अर्ज नामंजूर करणेबाबत प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी विनंती केली.

**४.** संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज त्यावरील प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे म्हणणे याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांचा सखोल युक्तीवाद ऐकला.

**५.** प्रस्तुत अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द दावा मिळकत वाटणी होऊन तुटक कब्जा मिळणेकरिता व निरंतर मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. तसेच वादी यांनी निशाणी क्र. ५ येथे तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दाखल केलेला असून प्रतिवादी यांना प्रस्तुत अर्जाची कारणे दाखवा नोटीस तसेच दाव्याचे समन्स रूजू झालेले असून प्रतिवादी हे आजरोजी न्यायालयात हजर झालेले असून प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी आपली कैफियत व निशाणी क्र. ५ यास म्हणणे दाखल केलेले असून प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांची कैफियत व निशाणी क्र. ५ चे अर्जास म्हणणे अद्याप दाखल केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दाावा हा प्रतिवादी क्र. १ यांचे निशाणी क्र. ५ चे अर्जास म्हणणे दाखल होऊन निशाणी क्र. ५ ची तुर्तातुर्त मनाई ताकीद अर्जाची न्याय्यचौकशी होणेवर प्रलंबित आहे.

**६.** वादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ ते ३ हे एकत्र असून दावा मिळकत तबदिल करणेचे तसेच दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. २ व ३ हे जबरदस्तीने कब्जा घेणेचे प्रयत्नात आहेत. असे झाले तर वादी यांचे न्याय्यहक्कावर गदा येणार आहे. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये जैसेथे परिस्थिती ठेवणेबाबत आदेश पारित करणेत यावेत अशी त्यांनी विनंती केली.

**७.** वादीतर्फे निशाणी क्र. ३/१ व ३/२ येथे दावा मिळकतीचा ७/१२ व ८अ उतारा दाखल केलेला आहे तर निशाणी क्र. ३/३ येथे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे दरम्यानचे करारपत्रकाच्या छायांकीत प्रती दाखल केलेल्या आहेत.

**८.** जैसेथे परिस्थिती ठेवणेबाबतचा अर्जाचा निर्णय करित असताना दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त ताकीद अर्जाचा न्यायनिर्णय करित

असताना पहावयाचे महत्वाचे घटक प्रथमदर्शनी बाजू, न्यायाचा समतोल व अपरिमित नुकसान हेच मापदंड जैसेथे परिस्थिती ठेवणेच्या अर्जास पाहणेची आवश्यकता असते. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकतीबाबत काही नोंद दस्त करण्याचे तसेच प्रतिवदी क्र. २ व ३ हे दावा मिळकतीचा जबदरस्तीने कब्जा घणेचे प्रयत्नात आहेत असे वादी यांचे कथन आहे. परंतू प्रतिवादी असे करण्याचे प्रयत्नात आहेत याबाबत सद्यस्थितीस प्रस्तुतचा अर्ज न्ययनिर्णीत करित असताना कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर नाही. प्रतिवादी क्र. १ यांचे निशाणी क्र. ५ येथे म्हणणे आल्या खेरीज तसेच निशाणी क्र. ५ च्या तुर्तातर्त ताकीद अर्जाची पूर्ण न्याय्यचौकशी होऊन त्याबाबत न्यायनिर्णय झालेखेरीज वादी यांना प्रथमदर्शनी बाजू आहे का हे अनुमान नोंदविणे योग्य होणार नाही. सद्यस्थितीस दाखल पुराव्यावरून व अर्जातील कथनांवरून दावा मिळकतीबाबत जैसेथे परिस्थिती ठेवणेइतपत अर्जात कथने तसेच दाखल पुरावा नाही. मा. ना. उच्च न्यायालय व सवौच्च न्यायालय यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार अपवादात्मक प्रकरणांमध्ये योग्य कारण असल्यास जैसेथे परिस्थिती ठेवणेबात आदेश पारित करणे गरजेचे आहे. परंतू प्रस्तुत अर्जामध्ये जैसेथे परिस्थिती ठेवणेइतपत ठोस कारण नमुद नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करित आहे.

**<u>आ दे श</u>**

**१.** वादी यांचा निशाणी क्र. १८ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

CHAITANYA SUNILDATTA DESHPANDE

Digitally signed by CHAITANYA SUNILDATTA DESHPANDE
Date: 2021.12.23 17:17:17 +0530

**दिनांक २३/१२/२०२१**

**( सी. एस. देशपांडे )**
**सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.**